**महाराष्ट्र शासन**

**क्र.एमएसआरएलएम/लेखा/ /२०२२**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
**ग्रामविकास विभाग,**
**पाचवा मजला, सिडको बिल्डींग,**
**(साऊथ विंग), कोकण भवन,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४**
**दि. २८/०९/२०२२**

**प्रति,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, तथा**
**जिल्हा अभियान संचालक,**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,**
**बीड, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, जालना, नंदुरबार,**
**नाशिक, उस्मानाबाद, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,**
**सोलापूर, ठाणे, वर्धा, यवतमाळ**

**निधी वितरण आदेश क्र.** ५५०

**विषय -: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प (NRETP) योजनेकरीता सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता निधी मर्यादा (Fund Limit) उपलब्ध करुन देणेबाबत.**

**संदर्भ -:** १. भारत सरकार, ग्रामविकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. File No. J-११०६०/३८/२०२१-RL (E-३७८५१६) दिनांक ११/०५/२०२२ अन्वये

२. जिल्हयाचा सन २०२२-२३ चा मंजुर वार्षिक कृती आराखडा (AAP)

३. भारत सरकार, ग्रामविकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No. G-२००११/१४/२०२०-RL (E-३७३२२३) दि. ०३ मे २०२१ अन्वये

महाराष्ट्र राज्यात सन २०१९ पासून राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प (NRETP) ही योजना राबविण्यास सुरुवात झालेली आहे. संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार सर्व केंद्र अनुदानित योजना (Centrally Sponsored Schemes) यांचे निधीचे प्रभावी व्यवस्थापन होण्यासाठी तसेच सार्वजनिक खर्चाचे उत्तम व्यवस्थापन होण्याच्या दृष्टीने राज्यात प्रत्येक केंद्र अनुदानित योजना (Centrally Sponsored Schemes) चे Single Nodal Agency (SNA) या पध्दतीची दि. ०१/०७/२०२१ रोजी पासुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प (NRETP) ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने सदर योजनेसाठी Single Nodal Agency (SNA) कार्यप्रणाली लागु करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्हयाला यानंतर निधी वितरीत न करता निधीची मर्यादा (Fund Limit) PFMS कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय नियंत्रण समिती, राज्यस्तरीय सर्वसाधारण समितीने तसेच संदर्भ क्र. ४ शासन परिपत्रकानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदीया, जालना, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापुर, ठाणे, वर्धा, यवतमाळ जिल्हयांना वित्तीय वर्ष २०२२-२३ मंजुर वार्षिक कृती आराखडयानुसार **रक्कम रु. ३४,००,०००/- (अक्षरी चौत्तीस लाख मात्र)** इतकी PFMS कार्यप्रणालीमध्ये निधीची मर्यादा (Fund Limit) उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरील निधीची मर्यादा (Fund Limit) खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सोबतच्या तक्त्यानुसार PFMS कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हानिहाय PFMS कार्याप्रणालीमध्ये प्रस्तावित निधी मर्यादा (Fund Limit)

(रु. लाखात)

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | या आदेशाव्दारे वितरीत करावयाचे निधी मर्यादा (Fund Limit) |
|---|---|---|
| १ | बीड | २.०० |
| २ | चंद्रपुर | ३.०० |
| ३ | गडचिरोली | २.०० |
| ४ | गोंदीया | २.०० |
| ५ | जालना | २.०० |
| ६ | नंदुरबार | ३.०० |
| ७ | नाशिक | २.०० |
| ८ | उस्मानाबाद | २.०० |
| ९ | पालघर | २.०० |
| १० | रत्नागिरी | १.०० |
| ११ | सिंधुदुर्ग | २.०० |
| १२ | सोलापुर | ३.०० |
| १३ | ठाणे | ०.०० |
| १४ | वर्धा | ३.०० |
| १५ | यवतमाळ | ५.०० |
| **एकुण** | | **३४.००** |

खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून खर्च करण्यात यावा.

अटी व शर्ती

१. सदर कार्यक्रमातील कामे सूरु करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घ्यावी.

२. सदर अनुदान राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प (NRETP) या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ च्या मंजुर वार्षिक कृती आराखडयानुसार वितरीत करण्यात येत असून लेखाशिर्ष व उपलेखाशिर्षनिहाय आपल्या जिल्हयाच्या भौतिक व आर्थिक लक्षांकानुसार मंजूर तरतूदीच्या मर्यादेत खर्च करावा.

३. सदर निधी अधिकारी / कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर २०२२ पर्यतचे वेतन व भत्ते, TA & DA अदा करण्यासाठी वितरीत करण्यात येत आहे.

४. निधी प्राप्त होताच त्वरीत अधिकारी / कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर २०२२ पर्यतचे वेतन व भत्ते, TA & DA प्रामुख्याने अदा करण्यात यावे.

५. निधी मर्यादा प्राप्त होताच त्वरीत निधी खर्च होईल याचे नियोजन प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी करावे.

६. क्षमता बांधणी अंतर्गत प्रशिक्षणाकरीता राज्य अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत वितरीत केलेल्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे सदर बाबीवर खर्च करण्यात यावा.

७. प्राप्त अनुदानामधुन झालेल्या खर्चाची स्वाक्षांकित माहिती या कार्यालयास पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत सादर करावी तसेच सदर माहिती / finance@umed.in या ई-मेल आयडी वर देखील पाठविण्यात यावी.

८. प्राप्त निधीसाठी जमा / खर्चाचे द्वीनोंदी लेखा पध्दती (Double Entry System) मध्ये स्वतंत्र लेखे ठेवावेत.

९. सदर खर्चाचे महालेखापाल / सनदी लेखापाल तसेच अंतर्गत लेखापरिक्षक यांचेकडून लेखापरीक्षण करण्यात येणार आहे त्याअनुषंगाने आवश्यक लेखे अद्यायावत ठेवावेत.

१०. जिल्हयाला PFMS कार्यप्रणालीमध्ये निधीची मर्यादा प्राप्त होत असल्यामुळे प्रत्येक जिल्हयांने PFMS कार्यप्रणालीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

११. जिल्हयांना PFMS कार्यप्रणालीमध्ये Single Nodal Agency (SNA) च्या मार्गदर्शक सुचनांचा तंतोतंत अवलंब करणे बंधनकारक आहे.

१२. देयकांमधील करविषयक तसेच संविधानिक वजातीच्या रक्कमांचा भरणा करणेबाबत देयकनिहाय वजातीच्या रक्कमांचा तपशिल आपले स्तरावर जतन करुन ठेवण्यात यावा व योग्य प्राधिकरणाकडे विहित मुदतीत नियमित भरणा करण्याची जबाबदारी प्रकल्प संचालक यांची राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

**प्रत माहितीस्तव -:**

१. मा. अप्पर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. महालेखापाल, महाराष्ट्र मुंबई, नागपूर
३. उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अवर सचिव, योजना ३, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. उपआयुक्त विकास, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व

**प्रत कार्यवाहीस्तव -:**

१. जिल्हा अभियान सहसंचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदीया, जालना, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापुर, ठाणे, वर्धा, यवतमाळ
२. जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदीया, जालना, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापुर, ठाणे, वर्धा, यवतमाळ
३. लेखाधिकारी, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदीया, जालना, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापुर, ठाणे, वर्धा, यवतमाळ